**४थे सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, माळशिरस यांचे न्यायालयात**

नियमीत दिवाणी दावा क्र २६१/२०१४

*दादासो उत्तम बाबर*

वि.

*हरीदास मारुती बाबर वगैरे*

**आदेश निशाणी क्रमांक ६७ खाली**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र ३ यांनी मुळ दाव्यास कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र ३ यांनी असे नमूद केले की, वादी यांनी प्रतिवादी विरुध्द मुळ दावा दाखल केला त्यावेळी वादी व प्रतिवादी क्र ३ यांचेमध्ये हद्दीबाबत वाद नव्हता त्यामुळे सदर दाव्याचे समन्स प्रमाणे प्रतिवादी क्र ३ हे दाव्याचे कामी कोर्टात हजर झाले नाहीत. प्रतिवादी क्र ३ हे दाव्याचे कामी कोर्टात हजर झाले नसल्याने दाव्याचे कामी प्रतिवादी क्र ३ विरुध्द एकतर्फा चौकशीचा आदेश झालेला आहे. तेथून पुढे दावा दिनांक २६.०२.२०१८ रोजी दुरुस्त केला त्यावेळी पर्यंत साधारण ४ वर्षाचा विलंब माफ व्हावा व दावा दिनांक २६.०२.२०१८ रोजी दुरुस्त केला तेथुनपुढे प्रतिवादी क्र ३ यांना कैफियत देणेस दिनांक २६.०२.२०१८ पासूत ते सप्टेंबर २०२२ पर्यंत साधारण ०३ वर्ष ०७ महिनेचा विलंब माफ व त्यामुळे निशाणी क्र १ वर पारीत विना कैफीयतीचा आदेश रद्द होवून मिळावा म्हणून अर्ज.

३. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता दिसून येते की, प्रतिवादी क्र ३ यांना दाव्याचे समन्स प्राप्त होवून ते दाव्याकामी हजर झाले परंतू त्यांनी त्यांची कैफीयत ९० दिवसाच्या आत सादर केली नाही. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ८ नियम १ नुसार प्रतिवादी क्र ३ यांच्यावर समन्स बजावल्यापासून ३० दिवसांच्या आत त्यांच्या बचावाची लेखी कैफीयत सादर करतील परंतू उक्त ३० दिवसांच्या मुदतीत लेखी कैफीयत दाखल करण्यास प्रतिवादीने कसुर केल्यास न्यायालयाने विर्निदिष्ट केले असेल अशा अन्य दिवशी ते लेखी कारण नमुद करुन दाखल करता येईल, मात्र असा दिवस समन्स बजावल्याच्या तारखेपासून ९० दिवसांपेक्षा नंतरचा असणार नाही.

४.    वरील दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ८ नियम १ ची तरतूद विचारात घेता प्रतिवादी क्र ३ यांना लेखी कैफियत समन्स प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत दाव्यात दाखल करणे अपेक्षीत होते परंतू प्रतिवादी क्र ३ यांनी प्रस्तुत दाव्यात आज दिनांक ०१.११.२०२३ रोजी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. अर्ज नि ६७ वर वादी यांनी म्हणणे दाखल आहे. वादी यांनी प्रतिवादी क्र ३ यांच्या अर्जावर हरकत घेवून अर्ज कायदेशीर नसल्याने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

५.    प्रतिवादी क्र ३ यांच्या विधीज्ञांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

६.    प्रस्तुत प्रकरणाचे आवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुतचे प्रकरण हे जाहीर ठराव व निरंतरचे ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. दावा मिळकतीमध्ये दोन्ही पक्षकारांचे हित जोपासलेले आहे. त्यामुळे दावा मिळकती संबंधीचे वाद गुणदोषावर अंतिमतः निकाली काढण्याकरीता प्रतिवादी क्र ३ यांना दाव्यात हजर होवून त्यांना लेखी कैफीयत व म्हणणे मांडण्याची संधी देणे न्यायोचित ठरेल. तसेच त्यांना संधी न दिल्यास ते नैसर्गीक न्यायतत्वाच्या विरुध्द ठरेल. सदर मिळकती संबंधी भविष्यात अनेक दावे टाळण्याच्या दृष्टीने प्रतिवादीना दाव्याच्या कामकाजात सहभागी होण्याची एक संधी देणे संयुक्तीक व रास्त ठरेल. म्हणून आदेश.

**आदेश**

१. नि.क्र. ६७ वरील प्रतिवादी क्र ३ यांचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. लेखी कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

३. प्रतिवादी क्र ३ यांची दाव्यास कैफियत वाचून नोंदविण्यात येत आहे.

MAHESH NARAYAN PATIL    Digitally signed by MAHESH NARAYAN PATIL Date: 2023.11.01 17:15:18 +0530

(एम. एन. पाटील)

दिनांक ०१/११/२०२३    ४थे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,

माळशिरस

## C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this PDF file order are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| **Name of the Court** | **:** | 4th Jt. C.J.J.D & J.M.F.C., Malshiras. |
| **Name of Stenographer** | **:** | Praveen Nagnath Nalla (Grade III) |
| **Order signed by the Presiding Officer on** | **:** | 01 / 11 / 2023. |
| **Order uploaded on** | **:** | 01 / 11 / 2023. |